भारत सरकार

विधि, न्याय व कंपनीकार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# नागरी संरक्षण अधिनियम, १९६८

**( सन १९६८ चा अधिनियम क्रमांक २७)**

[दिनांक ३१ मार्च, २००० रोजी यथाविद्यमान]

# The Civil Defence Act, 1968

**(Act No. 27 of 1968)**

**[ As in force on the 31st March, 2000]**

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले
२००४

**[ किंमत : रु. ५.०० ]**

**प्राक्कथन**

या आवृत्तीत, दिनांक ३१ मार्च, २००० रोजी यथाविद्यमान असलेला सिव्हिल डिफेन्स ॲक्ट, १९६८ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ११, अंक १, दिनांक २२ जून, २००० यात पृष्ठ ११ ते १६ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक २२ जून, २०००.

**डॉ. सुभाष चंद्र जैन,**
सचिव, भारत सरकार.

**PREFACE**

This edition of the Civil Defence Act, 1968 as on the 31st March, 2000, contains the Authoritative Text of that Act in Marathi which was published in *Gazette of India*, Extraordinary Part XII, Section 1, No. 1, Volume 11, dated 22nd June, 2000 on pages 11 to 16.

This Authoritative Text was published under the authority of the President under Section 2, Clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the Authoritative Text of that Act in Marathi.

New Delhi,
Dated the 22nd June, 2000.

DR. SUBHASH C. JAIN,
Secretary to the Government of India.

# नागरी संरक्षण अधिनियम, १९६८

कलमांचा क्रम

## प्रकरण एक

### प्रारंभिक

कलमे

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

२. व्याख्या.

## प्रकरण दोन

### नागरी संरक्षणासाठी नियम करण्याची केंद्र सरकारची शक्ती

३. नागरी संरक्षणासाठी नियम करण्याची शक्ती.

## प्रकरण तीन

### नागरी संरक्षण दल

४. नागरी संरक्षण दल घटित करणे.

५. सदस्यांची व अधिकाऱ्यांची नियुक्ती.

६. नागरी संरक्षण दलाच्या सदस्यांना काढून टाकणे.

७. अपील.

८. नागरी संरक्षण दलाच्या सदस्यांची कामे.

९. विनियम करण्याची शक्ती.

## प्रकरण चार

### संकीर्ण

१०. दलाच्या सदस्यांना झालेल्या क्षतींना वैयक्तिक क्षती (आणीबाणीविषयक उपबंध) अधिनियम याचे उपबंध लागू असणे.

११. शास्ती.

१२. इतर अधिनियमीतीशी विसंगत असलेले अधिनियम, नियम इत्यादींची परिणामकता.

१३. उपजीविकेच्या सामान्य व्यवसायांमध्ये शक्य तितका कमी हस्तक्षेप करणे.

१४. आदेशाच्या संबंधात व्यावृत्ती.

१५. सशस्त्र सेनांच्या संरक्षणाकरिता करण्यात आलेल्या उपाययोजनांस अधिनियम लागू नसणे.

१६. अभियोगावरील निर्बंध.

१७. प्रत्यायोजन करण्याची शक्ती.

१८. सद्भावपूर्वक केलेल्या कारवाईला संरक्षण.

१९. प्राधिकृत व्यक्ती आणि दलाचे सदस्य लोकसेवक असणे.

२०. नियम व विनियम संसदेसमोर ठेवावयाचे.

एच ४१०६—२ (१०३५—१-२००४)

# नागरी संरक्षण अधिनियम, १९६८

## (१९६८ चा अधिनियम क्रमांक २७)

(३१ मार्च, २००० रोजी यथा विद्यमान)

[२४ मे, १९६८]

**नागरी संरक्षणाकरता व त्याच्याशी संबंधित असलेल्या बाबींकरता उपबंध करण्यासाठी अधिनियम.**

भारतीय गणराज्याच्या एकोणिसाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

### प्रकरण एक

**प्रारंभिक**

१. (१) या अधिनियमास "नागरी संरक्षण अधिनियम, १९६८" असे म्हणावे. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

[1](२) त्याचा विस्तार संपूर्ण भारतभर आहे.

(३) तो, "भारत संरक्षण अधिनियम, १९६२" (१९६२ चा ५१) याच्या समाप्ति-दिनांकाच्या अगोदरचा नसलेला असा जो दिनांक[1] केंद्र सरकार अधिसूचनेद्वारे नियत करील त्या दिनांकास कोणत्याही राज्यात किंवा त्याच्या एखाद्या भागात अंमलात येईल, आणि वेगवेगळ्या राज्यांसाठी किंवा त्याच्या वेगवेगळ्या भागांसाठी वेगवेगळे दिनांक नियत करता येतील.

२. या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,— व्याख्या.

(क) "नागरी संरक्षण" यात कोणत्याही विद्रोही हल्ल्यापासून—मग तो हवाईमार्गे, भूमार्गे वा सागरीमार्गे होवो, किंवा इतर ठिकाणांहून होवो—भारतातील किंवा त्याच्या राज्यक्षेत्राच्या कोणत्याही भागातील कोणत्याही व्यक्तीला, मालमत्तेला, ठिकाणाला किंवा वस्तूला संरक्षण देण्यासाठी किंवा असा कोणताही हल्ला संपूर्णत: किंवा अंशत: निष्प्रभावी करण्यासाठी केलेल्या, पण प्रत्यक्ष संग्राम या सदरात न मोडणाऱ्या कोणत्याही उपाययोजनेचा समावेश आहे—मग अशी उपाययोजना अशा हल्ल्यापूर्वी किंवा हल्ल्याच्या दरम्यान केलेली असो वा हल्ल्याच्या वेळी किंवा हल्ल्यानंतर केलेली असो;

(ख) "नागरी संरक्षण दल" याचा अर्थ, पूर्णत: किंवा मुख्यत: नागरी संरक्षणाच्या गरजा भागविण्यासाठी उभारलेले दल, असा आहे आणि त्यात कलम ४, पोटकलम (१) मधील परंतुकान्वये दल म्हणून मानल्या गेलेल्या संघटनेचा समावेश आहे;

(ग) "विद्रोही हल्ला" याचा अर्थ, कोणत्याही युद्धाच्या वेळी, बाहेरून होणाऱ्या आक्रमणाच्या वेळी किंवा अंतर्गत दंगाधोप्याच्या वेळी, किंवा अन्य प्रसंगी, ज्यामुळे भारतातील किंवा त्याच्या राज्यक्षेत्राच्या कोणत्याही भागातील कोणतेही जीवित, मालमत्ता, ठिकाण किंवा वस्तु यांची सुरक्षितता धोक्यात येईल असा कोणत्याही व्यक्तीने किंवा व्यक्तिसमूहाने केलेला हल्ला, असा आहे;

(घ) "अधिसूचना" याचा अर्थ, शासकीय राजपत्रात प्रकाशित केलेली अधिसूचना, असा आहे;

(ङ) "वैयक्तिक सेवा क्षती" याला वैयक्तिक क्षती (आणीबाणीविषयक उपबंध) अधिनियम, १९६२ (१९६२ चा ५९) यामध्ये नेमून दिलेलाच अर्थ आहे;

(च) एखाद्या संघ राज्यक्षेत्राच्या संबंधात, "राज्य शासन" याचा अर्थ, संघ राज्यक्षेत्राचा प्रशासक, असा आहे.

### प्रकरण दोन

**नागरी संरक्षणासाठी नियम करण्याची केंद्र सरकारची शक्ती**

३. (१) नागरी संरक्षण सुनिश्चित करण्याकरता केंद्र सरकारला पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही बाबींचा उपबंध करण्यासाठी अधिसूचनेद्वारे नियम करता येतील, त्या अशा :— नागरी संरक्षणासाठी नियम करण्याची शक्ती.

(क) नागरी संरक्षणास ज्यामुळे बाध येण्याचा संभव असेल असे कोणतेही काम सुरू करण्यास प्रतिबंध करणे;

---

१. (संपूर्ण भारतात) १० जुलै, १९६८, पहा : अधिसूचना क्रमांक २४३५, दिनांक ५ जुलै, १९६८ पहा : भारताचे राजपत्र, १९६८, असाधारण, भाग दुसरा, विभाग ३ (दोन) इ. पृष्ठ ७६१.

(ख) लोकांना नागरी संरक्षणाचे शिक्षण देणे व अशा संरक्षणाच्या कामासाठी त्यांना तयार करणे ;

(ग) नागरी संरक्षणासाठी आवश्यक असलेल्या जिनसा व वस्तू यांची तरतूद करणे, साठवण करणे आणि त्या सुस्थितीत ठेवणे ;

(घ) बंदरांमधील व क्षेत्रीय जलधीमधील, वेला जलधींमधील] व अंतर्देशीय जलधींमधील वाहतुकीस, आणि जलयाने, बोये, दिवे व संकेत यांच्या वापरास बंदी करणे किंवा त्या वाहतुकीचे व वापराचे विनियमन करणे ;

(ङ) दिवे व ध्वनी यांवर नियंत्रण ठेवणे ;

(च) आग प्रतिबंधक उपाययोजना व इतर उपाययोजना करून जीविताचे व मालमत्तेचे संरक्षण करणे ;

(छ) शत्रूचा हल्ला झाल्यास कोणत्याही इमारती, जागा किंवा इतर इमले चटकन ओळखू येणार नाहीत अशाप्रकारे ते सुरक्षित करणे ;

(ज) जीवितास किंवा मालमत्तेस पोचणारा धोका टाळण्यासाठी कोणतीही इमारत, परिवास्तू किंवा अन्य इमले किंवा अन्य कोणतीही मालमत्ता पाडून टाकणे, नष्ट करणे किंवा ती निकामी करणे ;

(झ) (एक) स्फोटक द्रव्ये, ज्वालाग्राही पदार्थ, क्षयकारक आणि इतर घातक पदार्थ किंवा वस्तू, शस्त्रे व दारूगोळा ;

(दोन) जलयाने ;

(तीन) बिनतारी तार संदेशाची उपकरणे ;

(चार) वायुयाने; आणि

(पाच) छायाचित्रणाची व चिन्ह संकेतनाची उपकरणे आणि माहिती ध्वनिलिखित करण्याचे कोणतेही साधन ;

जवळ बाळगण्यास, त्यांचा वापर करण्यास किंवा त्यांची विल्हेवाट लावण्यास बंदी करणे किंवा त्याबाबत विनियमन करणे ;

(ञ) क्षेत्रे खाली करणे व मालमत्ता किंवा जनावरे तेथून हलवणे ;

(ट) एखाद्या क्षेत्रातून निर्वासित करण्यात आलेल्या व्यक्तींची दुसऱ्या क्षेत्रात सोय लावणे आणि अशा क्षेत्रात सोय लावण्यात आलेल्या निर्वासित व्यक्तींच्या वर्तनाचे विनियमन करणे ;

(ठ) निर्वासित व्यक्ती किंवा या अधिनियमाखालील कार्ये करण्यास प्राधिकृत करण्यात आलेल्या व्यक्ती यांच्याबाबत निवासादेश देणे ;

(ड) नुकसान पोचलेल्या इमारती, इमले व मालमत्ता वाचवणे आणि मृतांची विल्हेवाट लावणे ;

(ढ) इजा पोचलेल्या, बेवारशी किंवा धोकादायक अशा जनावरांना पकडणे व ती ताब्यात ठेवणे किंवा नष्ट करणे ;

(ण) (एक) बंदरे, गोद्या, दीपगृहे, दीपनौका, विमानतळ व विमानचालनाशी संबंधित अशा सोयी ;

(दोन) रेलमार्ग, ट्रामभार्ग, रस्ते, पूल, कालवे आणि भूमार्गे किंवा जलमार्गे परिवहन करण्याची अन्य सर्व साधने ;

(तीन) तारयंत्रे, डाकघरे, चिन्ह संकेतनाची उपकरणे आणि संदेश वाहनाची अन्य सर्व साधने ;

(चार) पाण्याची प्राप्तिस्थाने व प्रवाह व्यवस्था, पाणी, गॅस किंवा वीज यांच्या पुरवठ्यासाठी केलेली बांधकामे आणि सार्वजनिक प्रयोजनाची अन्य सर्व बांधकामे ;

(पाच) जलयाने, वायुयाने, 'मोटार वाहन अधिनियम, १९३९' (१९३९ चा ४) यामध्ये व्याख्या केली आहे अशी परिवहनाची वाहने आणि रेलमार्गाची व ट्रामभार्गाची रुळ याने ;

(सहा) वखारी आणि साठवणीच्या कामासाठी वापरण्यात येणाऱ्या किंवा वापरण्यासाठी नियोजित असलेल्या अन्य सर्व जागा ;

(सात) सरसकट सर्व खाणी, तेलक्षेत्रे, कारखाने किंवा औद्योगिक अगर वाणिज्यिक उपक्रम किंवा कोणताही विशिष्ट खाण, तेलक्षेत्र, कारखाना किंवा औद्योगिक वा वाणिज्यिक उपक्रम ;

(आठ) जेथे वैज्ञानिक किंवा तंत्रशास्त्रीय संशोधन करण्यात येते किंवा तत्संबंधी प्रशिक्षण देण्यात येते, अशा प्रयोगशाळा किंवा संस्था ;

(नऊ) या खंडामध्ये यापूर्वी उल्लेख करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टींचा भाग असलेली किंवा तिच्याशी संबंधित असलेली सर्व बांधकामे व इमले, आणि

(दहा) नागरी संरक्षण सुनिश्चित करण्यासाठी जिचे रक्षण करणे जरुरीचे किंवा समयोचित समजले जाते अशी, शासनाच्या किंवा एखाद्या स्थानिक प्राधिकरणाच्या किंवा निमसरकारी अगर स्वायत्त संघटनेच्या कामासाठी वापरण्यात येणारी किंवा वापरण्याचे नियोजित असलेली अन्य कोणतीही जागा किंवा वास्तू,

सुरक्षित ठेवण्याची निश्चिती करणे;

(त्) कोणताही रस्ता किंवा पायवाट, जलमार्ग, तरी किंवा पूल, नदी, कालवा किंवा पाण्याचे अन्य प्राप्तिस्थान यांवर नियंत्रण ठेवणे;

(थ्) शासन किंवा त्याचा कोणताही विभाग किंवा कोणतेही स्थानिक प्राधिकरण, पोलीस दलाचे सदस्य, अग्निशामक दल, आणि प्रामुख्याने नागरी संरक्षणाहून अन्य प्रयोजनांकरिता योजलेल्या अन्य कोणत्याही सेवेचे किंवा प्राधिकरणाचे सदस्य यांना आपापल्या अधिकारिताक्षेत्रांमध्ये किंवा त्यांनी नेमलेल्या कोणत्याही कर्मचारीवर्गाच्या संबंधात कोणते खबरदारीचे उपाय योजावे लागतील ते;

(द्) गणवेश—मग तो अधिकृत असो वा अन्य प्रकारचा असो—ध्वज, पदके, बिल्ले व अन्य अधिचिन्हे यांसारखी अधिकृत सन्मानचिन्हे किंवा इतर तत्सम वस्तू यांचा वापर करण्यामागे फसवणूक करण्याचा किंवा नागरी संरक्षणाला बाध आणण्याचा उद्देश असेल त्याबाबतीत त्यांच्या वापरात प्रतिबंध करणे किंवा त्यावर नियंत्रण ठेवणे;

(ध्) कोणत्याही संभाव्य शत्रू हल्ल्यांमुळे उद्भवणाऱ्या धोक्यापासून सर्वसाधारण जनतेचे किंवा जनतेतील कोणत्याही व्यक्तीचे संरक्षण करण्याच्या किंवा त्यांना त्याची माहिती करून देण्याच्या दृष्टीने व्यक्तींनी किंवा प्राधिकरणांनी घ्यावयाची खबरदारी किंवा करावयाची कारवाई;

(न्) एखाद्या इमारतीच्या, संरचनेच्या किंवा जागेच्या मालकास किंवा ताबाधारकास आगीचा ठावठिकाणा शोधून काढण्यासाठी व आगीस प्रतिबंध करण्यासाठी आवश्यक असेल अशी तजवीज करण्यास किंवा ती अंमलात आणण्यास भाग पाडणे;

(प्) आगीचा उद्रेक झाला असता ती आटोक्यात आणण्यासाठी विनिर्दिष्ट उपाययोजना करणे;

(फ्) विनिर्दिष्ट बाबतीत दिलेली कोणतीही सूट वगळता, कोणत्याही विनिर्दिष्ट क्षेत्रात हजर असलेल्या कोणत्याही व्यक्तीला विनिर्दिष्ट प्राधिकरणाने किंवा व्यक्तीने दिलेल्या लेखी परवान्यांखाली प्राधिकार मिळाल्याखेरीज, तिने विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा वेळांमध्ये घराबाहेर जाता कामा नये असा, निदेश देणे;

(ब्) (एक) नागरी संरक्षणास बाधक अशा बाबी अंतर्भूत असलेले कोणतेही वृत्तपत्र, वार्तापत्र, पुस्तक किंवा अन्य दस्तऐवज मुद्रित किंवा प्रकाशित करण्यास बंदी करणे;

(दोन) उप-खंड (एक) मध्ये निर्देशिलेल्यांपैकी कोणतीही बाब अंतर्भूत असलेले कोणतेही वृत्तपत्र, वार्तापत्र, पुस्तक किंवा अन्य दस्तऐवज यांच्या मुद्रणासाठी किंवा प्रकाशनासाठी उपयोगात आणलेल्या कोणत्याही मुद्रणालयाकडून जामीन मागवणे व त्यांच्या प्रती जप्त करणे;

(भ्) ज्या क्षेत्रांवर नियंत्रण ठेवणे जरुरीचे किंवा समयोचित समजले जाते अशा क्षेत्रांना अनुलक्षून व्यक्तींच्या वर्तनाचे विनियमन करणे व अशा क्षेत्रांतून व्यक्तींना दूर हलवणे;

(म्) कोणत्याही नागरी संरक्षण योजनेचे अनुपालन करण्यास कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यक्तिवर्गाला भाग पाडणे;

(य्) नागरी संरक्षणाच्या कामांकरिता आवश्यक असेल असा अन्य कोणताही उपबंध.

(२) पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाबींच्या संबंधात राज्यशासन आदेश देऊ शकेल, असे त्या पोटकलमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही नियमात उपबंधित करता येईल.

(३) पोटकलम (१) खाली करण्यात आलेल्या कोणत्याही नियमात, त्या नियमाच्या किंवा त्याखाली देण्यात आलेल्या कोणत्याही आदेशाच्या व्यतिक्रमणाबद्दल पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतका द्रव्यदंड होईल आणि जेथे व्यतिक्रमण सतत होत असेल त्याबाबतीत, पहिल्या दिवसानंतर ज्या ज्या दिवशी असे व्यतिक्रमण चालू राहील त्या प्रत्येक दिवसामागे पन्नास रुपयांपर्यंत असू शकेल इतका आणखी द्रव्यदंड होईल, असा उपबंध करता येईल.

## प्रकरण तीन

### नागरी संरक्षण दल

४. (१) राज्य शासनास, त्या राज्यातील कोणत्याही क्षेत्रासाठी "नागरी संरक्षण दल" म्हणून संबोधला जाणारा (यात यापुढे "दल" म्हणून उल्लेखलेला) एक व्यक्ति-निकाय घटित करता येईल आणि अशा दलाचे अधिपत्य करण्यासाठी, त्याच्यामते जिचा जिल्हा दंडाधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसेल (व जी "नियंत्रक" म्हणून ओळखली जाईल) अशा व्यक्तीची नियुक्ती करता येईल : नागरी संरक्षण दल घटित करणे.

परंतु, राज्यातील एखाद्या क्षेत्रात या अधिनियमाचा प्रारंभ होण्याच्या निकटपूर्वी राज्य शासनाच्या मते जिच्याकडे दलाची कामे सोपवता येण्यासारखी आहेत, अशी एखादी संघटना त्या क्षेत्रात अस्तित्वात

असेल तर, राज्य शासन अशा क्षेत्राकरिता स्वतंत्र दल घटित करण्याऐवजी त्या संघटनेला त्या क्षेत्रातील दलाची कामे हाती घेण्यास किंवा पार पाडण्यास पाचारण करू शकेल, आणि तद्नंतर या अधिनियमाच्या प्रयोजनांपुरते अशी संघटना ही, त्या क्षेत्राचे दल असल्याचे मानण्यात येईल.

(२) राज्य शासनास, त्या राज्यातील नियंत्रकांच्या कार्याचा समन्वय साधण्यासाठी नागरी संरक्षण संचालकाची नियुक्ती करता येईल आणि प्रत्येक नियंत्रक अशा संचालकाने दिलेल्या निदेशांचे अनुपालन करील.

सदस्यांची व अधिकाऱ्यांची नियुक्ती.

५. (१) राज्य शासनास दलाचे सदस्य म्हणून काम करण्यास लायक व इच्छुक असलेल्या व्यक्तींची, तसे सदस्य म्हणून नियुक्ती करता येईल, आणि नियंत्रकाला याप्रमाणे नियुक्त झालेला कोणताही सदस्य, त्याच्या मते दलातील जे अधिकारपद किंवा अधिपतिपद धारण करण्यास लायक असेल, त्या त्या पदावर अशा सदस्याची नियुक्ती करता येईल.

(२) दलाचा सदस्य म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या प्रत्येक व्यक्तीस, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात सदस्यत्व प्रमाणपत्र देण्यात येईल.

नागरी संरक्षण दलाच्या सदस्यांना काढून टाकणे.

६. दलाचा एखादा सदस्य, असा सदस्य म्हणून आपली कामे समाधानकारकरीत्या पार पाडण्यास चुकला आहे किंवा चुकला होता असे नियंत्रकाचे मत असेल किंवा असा सदस्य म्हणून आपली कामे पार पाडत असताना कोणतेही गैरवर्तन करण्याबद्दल दोषी आहे किंवा दोषी होता असे आढळून आले असेल तेव्हा अशा दलसदस्यास, त्याच्याविरुद्ध असलेल्या दोषारोपांबाबत स्वतःचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देऊन चौकशी केल्यानंतर नियंत्रक अशा सदस्याला आदेशाद्वारे दलामधून काढून टाकू शकेल.

(२) दलाचा एखादा सदस्य दलात असण्याचे चालू राहणे अनिष्ट आहे असे नियंत्रकाचे मत असेल तेव्हा कोणतेही कारण न देता, अशा सदस्यास दलातून विनासोपस्कार काढून टाकू शकेल.

अपील.

७. दलातील ज्या सदस्याला कलम ६ खाली दलातून काढून टाकण्यात आले असेल त्याला, अशा रीतीने काढून टाकण्यात आल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत राज्य शासनाकडे अपील करता येईल, आणि असे अपील आल्यावर ते शासन, नियंत्रकाने किंवा अन्य प्राधिकरणाने दिलेला आदेश कायम करू शकेल, त्यात फेरबदल करू शकेल किंवा तो फिरवू शकेल.

नागरी संरक्षण दलाच्या सदस्यांची कामे.

८. (१) दलाचे सदस्य नागरी संरक्षणाच्या उपाययोजना अंमलात आणण्याच्या संबंधात या अधिनियमाखाली करण्यात आलेल्या नियमांद्वारे किंवा त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही विधीद्वारे त्यांना नेमून देण्यात येतील ती कामे पार पाडतील.

(२) राज्य शासन किंवा नियंत्रक आदेशाद्वारे, दलाच्या एखाद्या सदस्यास प्रशिक्षणासाठी किंवा नागरी संरक्षणाच्या उपाययोजना अंमलात आणण्यासंबंधात अशा आदेशात विनिर्दिष्ट केली जातील ती कामे पार पाडण्यासाठी पाचारण करू शकेल.

(३) यासंबंधात केंद्र सरकार देईल अशा आदेशांच्या अधीनतेने, कोणत्याही राज्यातील दलाच्या कोणत्याही सदस्यास कोणत्याही वेळी अन्य कोणत्याही राज्यातील नागरी संरक्षणाच्या संबंधातील काम पार पाडण्यास आदेशाद्वारे फर्माविता येईल, आणि अशी कामे पार पाडत असताना तो सदस्य त्या दुसऱ्या राज्याच्या दलाचा सदस्य असल्याचे मानण्यात येईल आणि त्या दुसऱ्या राज्यातील दलाच्या सदस्याला असलेल्या शक्ती, कामे व विशेषाधिकार त्याच्या ठायी निहित होतील व तो त्या सदस्यांच्या दायित्वांना अधीन असेल.

विनियम करण्याची शक्ती.

९. (१) या प्रकरणाची प्रयोजने पार पाडण्याकरिता केंद्र सरकारला अधिसूचनेद्वारे विनियम करता येतील.

(२) विशेषत: आणि पूर्वगामी शक्तींच्या व्यापकतेला बाध न येता, अशा विनियमांद्वारे,—

(क) दलाच्या सदस्यांची कामे विहित करता येतील आणि त्यांना सेवेसाठी कशाप्रकारे पाचारण करावे ते विनियमित करता येईल;

(ख) कोणत्याही दलाच्या किंवा सर्व दलांच्या सदस्यांची संघटना, नियुक्ती, सेवेच्या शर्ती, अनुशासन, साज-सरंजाम आणि कपडालत्ता यांचे विनियमन करता येईल;

(ग) कोणत्याही दलाच्या किंवा सर्व दलांच्या सदस्यत्व-प्रमाणपत्रांचा नमुना विहित करता येईल.

## प्रकरण चार

### संकीर्ण

दलाच्या सदस्यांना झालेल्या क्षतींना वैयक्तिक क्षती (आणीबाणी विषयक उपबंध) अधिनियम यांचे उपबंध लागू असणे.

१०. वैयक्तिक क्षती (आणीबाणीविषयक उपबंध) अधिनियम, १९६२ (१९६२ चा ५९) याचे आणि त्याखाली करण्यात आलेल्या प्रत्येक योजनेचे उपबंध हे नागरी संरक्षण स्वयंसेवकास झालेल्या वैयक्तिक सेवा क्षतीला जसे लागू होतात त्याच प्रकारे ते, होईल तेथवर, दलाचा सदस्य म्हणून नियुक्त झालेल्या कोणत्याही व्यक्तीस झालेल्या वैयक्तिक सेवा क्षतीला खालील फेरबदलांसह लागू होतील. ते असे—

(क्) त्या अधिनियमाखालील किंवा तदन्वये केलेल्या कोणत्याही योजनेखालील नागरी संरक्षण स्वयंसेवक म्हणून केलेल्या निर्देशाचा अर्थ, दलाच्या सदस्याचा निर्देश म्हणून लावला जाईल.

(ख्) त्यामध्ये आणीबाणीच्या कालावधीचा जो कोणताही निर्देश केलेला असेल त्याचा अर्थ, दलाच्या सदस्याच्या संबंधात, हा अधिनियम अमलात असेल त्या कालावधीचा निर्देश म्हणून लावला जाईल.

शास्ती.

११. (१) जर कलम ८ च्या पोटकलम (२) खालील आदेशाद्वारे पाचारण करण्यात आले असता दलाचा एखादा सदस्य अशा आदेशाचे पालन करण्याबाबत किंवा असा सदस्य म्हणून आपली कार्ये पार पाडण्याबाबत पुरेशा सबबीशिवाय उपेक्षा करील किंवा तसे करण्यास नकार देईल किंवा त्याची कार्ये पार पाडण्यासाठी त्याला दिलेल्या कोणत्याही वैध आदेशाचे किंवा निदेशाचे पालन करण्याबाबत उपेक्षा करील किंवा तसे करण्यास नकार देईल तर पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास आणि जेव्हा अशी उपेक्षा करणे किंवा नकार देणे सतत चालू राहील तेव्हा पहिल्या दिवसानंतर ज्या ज्या दिवशी असे व्यतिक्रमण चालू राहील, त्या प्रत्येक दिवसामागे पन्नास रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या आणखी द्रव्यदंडास तो पात्र होईल.

(२) जर एखादी व्यक्ती या अधिनियमाखाली किंवा तदन्वये करण्यात आलेल्या नियमाखाली तिला देण्यात आलेल्या कोणत्याही आदेशाचे किंवा निदेशाचे पालन करण्याबाबत, कोणत्याही वाजवी सबबी शिवाय उपेक्षा किंवा कसूर करील तर, पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास आणि जेव्हा अशी उपेक्षा किंवा कसूर सतत चालू राहील तेव्हा, पहिल्या दिवसानंतर ज्या ज्या दिवशी अशी उपेक्षा किंवा कसूर चालू राहील, त्या प्रत्येक दिवसामागे पन्नास रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या आणखी द्रव्यदंडास ती पात्र होईल.

इतर अधिनियमितींशी विसंगत असलेले अधिनियम, नियम, इत्यादींची परिणामकता.

१२. (१) या अधिनियमाचे किंवा त्याअन्वये करण्यात आलेल्या कोणत्याही नियमाचे उपबंध या अधिनियमान्वये किंवा अशा कोणत्याही नियमान्वये देण्यात आलेला कोणताही आदेश, त्याच्याशी विसंगत असे काहीही, या अधिनियमाहून अन्य कोणत्याही अधिनियमितीमध्ये किंवा या अधिनियमाहून अन्य कोणत्याही अधिनियमितीच्या आधारे परिणामक असलेल्या कोणत्याही संलेखामध्ये अंतर्भूत असले तरी, परिणामक होतील.

(२) या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी नागरी संरक्षणासंबंधीच्या कोणत्याही विधीद्वारे किंवा त्याअन्वये, नागरी संरक्षणाच्या संबंधात करण्यात आलेली प्रत्येक नियुक्ती, आदेश, किंवा नियम जेथवर या अधिनियमाच्या उपबंधाशी विसंगत नसेल तेथवर, आणि या अधिनियमान्वये तो विखंडित करण्यात येत नाही किंवा बदलण्यात येत नाही तोपर्यंत त्याचा अंमल चालू राहील, आणि तो या अधिनियमाच्या समनुरुप उपबंधाखाली करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.

**स्पष्टीकरण.**—कोणत्याही उपबंधाच्या किंवा क्षेत्राच्या संबंधात "या अधिनियमाचा प्रारंभ" याचा अर्थ, त्या उपबंधाचा प्रारंभ, किंवा यथास्थिति, त्या क्षेत्रात या अधिनियमाचा प्रारंभ, असा आहे.

उपजीविकेच्या सामान्य व्यवसायांमध्ये शक्य तितका कमी हस्तक्षेप करणे.

१३. या अधिनियमानुसार कार्य करणारे कोणतेही प्राधिकरण किंवा व्यक्ती सार्वजनिक सुरक्षितता व नागरी संरक्षण सुनिश्चित करण्याच्या हेतूशी सुसंगत होईल तितपत उपजीविकेचे सामान्य व्यवसाय व मालमत्तेचा उपभोग यांमध्ये शक्य तितका कमी हस्तक्षेप करील.

आदेशांच्या संबंधात व्यावृत्ती.

१४. (१) या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली प्रदान केलेल्या कोणत्याही शक्तीचा वापर करून काढलेल्या आदेशाला कोणत्याही न्यायालयात आक्षेप घेतला जाणार नाही.

(२) जेथे एखादा आदेश या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली प्रदान केलेल्या कोणत्याही शक्तीचा वापर करून एखाद्या प्राधिकरणाने काढलेला व स्वाक्षरित केला असल्याचे दिसत असेल तेथे, न्यायालय, असा आदेश त्या प्राधिकरणाने काढलेला आहे असे "भारतीय साक्षी पुरावा अधिनियम, १८७२" (१८७२ चा १) यात अभिप्रेत असल्याप्रमाणे गृहीत धरील.

सशस्त्र सेनांच्या संरक्षणाकरिता करण्यात आलेल्या उपाययोजनांस अधिनियम लागू नसणे.

१५. या अधिनियमात किंवा त्याखाली करण्यात आलेल्या कोणत्याही नियमात, विनियमात किंवा आदेशात अंतर्भुत असलेली कोणतीही गोष्ट, संघाच्या सशस्त्र सेनांस अथवा नागरी संरक्षण किंवा संघाच्या सशस्त्र सेनांना सुरक्षितता सुनिश्चित करण्याच्या प्रयोजनासाठी किंवा कोणत्याही नौसैनिकी, भूसैनिकी किंवा वायुसैनिकी संच मांडण्याच्या किंवा भंडाराच्या संरक्षणाकरता संघाच्या सशस्त्र सेनांच्या नियंत्रक प्राधिकाऱ्यांपैकी कोणीही केलेल्या कोणत्याही उपाययोजनेला लागू असणार नाही.

अभियोगावरील निर्बंध.

१६. या अधिनियमाखाली शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाबद्दल, नियंत्रकाखेरीज किंवा या संबंधात नियंत्रकाने प्राधिकृत केलेल्या व्यक्तिखेरीज किंवा त्याच्या संमतीखेरीज कोणालाही एखाद्या व्यक्तीविरुद्ध कोणताही अभियोग सुरू करता येणार नाही.

प्रत्यायोजन करण्याची शक्ती.

१७. राज्य शासन, अधिसूचनेद्वारे असे निदेशित करू शकेल की—

(क) त्यास या अधिनियमाखाली वापरता येतील अशा सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही शक्ती राज्य शासनाच्या मते जिल्हा दंडाधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला जो अधिकारी उक्त अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा अधिकाऱ्यालाही, त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या परिस्थितीत व कोणत्याही शर्ती असल्यास तशा शर्तीनुसार वापरता येतील.

(ख) या अधिनियमाखाली नियंत्रकाला वापरता येतील अशा सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही शक्ती, राज्य शासनाच्या मते उप विभागीय दंडाधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला जो अधिकारी उक्त अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल, अशा अधिकाऱ्यालाही, त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या परिस्थितीत व तशा अटीनुसार वापरता येतील.

सद्भावपूर्वक केलेल्या कारवाईला संरक्षण.

१८. (१) या अधिनियमाखाली अथवा तद्न्वये करण्यात आलेल्या कोणत्याही नियमाखाली किंवा आदेशाखाली किंवा अशा कोणत्याही नियमान्वये काढण्यात आलेल्या कोणत्याही आदेशाखाली सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल, शासन, संचालक अथवा नियंत्रक यांच्याविरुद्ध अथवा शासनाने किंवा नियंत्रकाने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही दावा, अभियोग किंवा अन्य वैध कार्यवाही करता येणार नाही.

(२) या अधिनियमाखाली किंवा तद्न्वये करण्यात आलेल्या कोणत्याही नियमालाही किंवा अशा कोणत्याही नियमान्वये काढण्यात आलेल्या कोणत्याही आदेशाखाली सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे, झालेल्या किंवा होण्याचा संभव असलेल्या, कोणत्याही नुकसानाबद्दल, शासन, संचालक किंवा नियंत्रक यांच्याविरुद्ध अथवा शासनाने किंवा नियंत्रकाने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही दावा किंवा अन्य वैध कार्यवाही करता येणार नाही.

प्राधिकृत व्यक्ती व दलाचे सदस्य आणि लोकसेवक असणे.

१९. या अधिनियमाखाली नियंत्रकाने किंवा राज्य शासनाने प्राधिकृत केलेली कोणतीही व्यक्ती दलाचा प्रत्येक सदस्य, त्या नात्याने कार्य करीत असताना "भारतीय दंड संहिता" (१८६० चा ४५) कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानले जाईल.

[1][नियम व विनियम संसदेसमोर ठेवावयाचे.

२०. या कलमाखाली केंद्र सरकारने केलेला प्रत्येक नियम व विनियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने अथवा दोन क्रमवर्ती सत्रांनी बनलेल्या एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरता सत्रासीन असताना, ठेवला जाईल, आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या नंतरचे सत्र संपण्यापूर्वी, जर त्या नियमात किंवा विनियमात, कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले किंवा तो नियम किंवा विनियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, तो नियम किंवा विनियम त्यानंतर यथास्थिति, अशा आपरिवर्तित रूपात परिणामक होईल किंवा मुळीच परिणामक होणार नाही, तथापि अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे तत्पूर्वी त्या नियमाखाली किंवा विनियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.]

---

१. १९८३ चा अधिनियम २०, कलम २ व अनुसूचीद्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१५ मार्च, १९८४ रोजी व तेव्हांपासून).

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई